- प्रकरण पहिले -

# ग्रामीण कथा, काळ, स्वरूप वैशिष्ठ्ये, दलित कथा आणि नागरी कथा यांचेशी थोडक्यात तुलना

## प्रकरण पहिले

## "ग्रामीण कथा, काळ, स्वरूप, वैशिष्टये दलित कथा आणि नागरी कथा यांचेशी थोडक्यात तुलना "

---

प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण साहित्याच्या सामाजिकतेचा अभ्यास 'मातीखालची माती' व 'उखडलेली झाडे' या दोन पुस्तकांच्या आधारे मांडण्याचा मानस आहे. म्हणून अगोदर ग्रामीण साहित्याचे तंत्र कसे आहे, त्याचा मंत्र कोणता आहे, त्याचे निकष कोणते आहेत, हे समजावुन घेणे आवश्यक वाटते. त्यादृष्टीने पहिल्या प्रकरणात ग्रामीण साहित्याचा आढावा घ्यावयाचा आहे.

### ग्रामीण साहित्य म्हणजे काय?

प्रथम ग्रामीण साहित्याच्या वेगवेगळया साहित्यिकांनी लिहिलेल्या व्याख्या पाहू.

1) **आनंद यादव :-**

"ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय? ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले? की ग्रामिणांकरिता लिहिलेले? की हे सर्वच ".[1]

पुढे जाऊन ग्रामीण साहित्याविषयी ते सांगतात -

"ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण मनाचा, समाजाचा अनेक ताणतणाव्यासह शब्दरूप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो तो त्या प्रदेशाचा चालता-बोलता इतिहास असतो".[2]

2) **नागनाथ कोतापल्ले :-**

"ग्रामीण साहित्यातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून निर्माण होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय".[3]

ते पुढे म्हणतात -

"माणसाचे, माणसाच्या मनोविश्वाचे, व्यवहारांचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य".[4]

3) द. ता. भोसले :-.

"निसर्गाच्या नेत्रांनी माणसाचे आयुष्य न्याहाळून त्या जीवनाच्या आतले जे जीवन प्रतित होत असते ते ही निसर्ग दृष्टीतूनच अनुभवले पाहिजे. त्यातील स्थूलता, सांकेतिकता आणि हिनता बाजूला सारून एका चैतन्याने, दुस-या चैतन्याला मारलेल्या मिठीचे अन् एकरूप झालेल्या दिठीचे साक्षात्कारी चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य होय".[5]

या सर्वांच्या म्हणजे भोसले, कोतापल्ले व यादव यांच्या ग्रामीण साहित्याच्या व्याख्यांचा विचार केला तर असे दिसते की, - ग्रामीण साहित्य हे ग्रामीण लोकांसाठीच लिहिलेले साहित्य नसून त्यात ग्रामीण लोकांच्या मनाचा, व्यवहारांचा, समाजाचा शोध घेऊन व तेथील संस्कृती, तेथील परिस्थिती, अंधश्रध्दा यांचा विचार करून ग्रामीण आणि नागरी भागातील लोकांसाठी लिहिलेले साहित्य तेच ग्रामीण साहित्य होय.

ग्रामीण साहित्य हे आपलेच साहित्य आहे अशी आस्था बाळगणा-या वाचकांचा विचार करून गो.म. कुलकर्णी म्हणतात -

"ग्रामीण साहित्य ही संज्ञा रूढ होऊन आज कितीतरी काळ लोटला आहे. 'ग्रामीण ' या विशेषणाने लिहले गेलेले साहित्यही मोठया प्रमाणात होत आहे. तरीही या साहित्याच्या प्रेरणा , स्वरूप किंवा समस्या यांची सविस्तर चर्चा करणारी समिक्षाकृती आजही उपलब्ध नाही. ग्रामीण साहित्याच्या तुलनेने कितीतरी मागून आलेल्या (आणि तिखट झालेल्या) दलित साहित्यावर बघता बघता दहा-पाच ग्रंथ पैदा व्हावेत आणि ग्रामीण साहित्याचा परामर्श घेणारा एकही ग्रंथ आजवर उपलब्ध होऊ नये हे चमत्कारिक नव्हे काय? ग्रामीण साहित्य समिक्षेच्या उपेक्षेची कारणे मात्र निटशी न

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

उमगणारी, ग्रामीण साहित्य हे पृथगात्म न मानता मध्यवर्ती मराठी साहित्याची एक रेषा मानली गेल्याचा हा एक परीणाम असावा. कारणे कोणतीही असली तरी त्याची समीक्षादृष्ट्या आबाळच झाली या वस्तुस्थितीत फरक पडत नाही".[6]

खेडयाचे संपूर्ण जीवनच शेतीवर अवलंबून असते आणि तेच जीवन ग्रामीण कथेतून व्यक्त होत असते. त्यातील रीती, त्यांचा निसर्गाशी, मातीशी असणारा घनिष्ट संबंध, त्यांची होणारी आर्थिक कुचंबना, तेथील लोकांच्या पडलेल्या ज्ञानविषयक मर्यादा या सर्वांचेच चित्रण कथेत येत असते.

ग्रामीण साहित्याला ख-या अर्थाने 1920 पासून प्रारंभ झाला असला तरी यापाठीमागे जाऊन विचार केला तर हरिभाऊंच्याही आधी महात्मा जोतीबा फुले यांनी 'शेतक-यांचा आसूड' हे पुस्तक लिहून त्यात शेतक-यांची होणारी हालआपेष्टा, त्यांची होणारी आर्थिक कुचंबना असे त्यांनी ग्रामातील जीवनच रेखाटले आहे.

फुल्यांनंतर मग हरिभाऊंनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही स्फूट गोष्ट लिहून ग्रामीण कथालेखनास सुरूवात करून दिली. 1897 साली दुष्काळ पडला होता त्यावेळच्या शेतक-यांच्या दुःखाला, परिस्थितीला अनुलक्षून ही कथा लिहली. पण तो 'एक वाड.मयीन अपघात होता' असे यादव म्हणतात.

"हरिभाऊंची "काळ तर मोठा कठीण आला" ही स्फूट गोष्ट खरी पण ती ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा घेऊन जन्माला आलेली नाही. केवळ आज ग्रामीण जीवनाच्या विपुलतेमुळे त्यांच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खूण दिसते एवढेच"[7].

ग्रामीण जीवनाविषयीच्या जाणिवा घेऊन 1925 पासून प्रादेशिक ग्रामीण कथा लिहली जाऊ लागली. वि.स. सुखटणकर यांनी 1931 साली प्रादेशिक ग्रामीण कथा प्रथम निर्माण केल्या. 'आजचे कालचे गोमंतक' व 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या दोन कथासंग्रहापासूनच प्रादेशिक ग्रामीण कथेची सुरूवात समजावयास हरकत नाही.

गोव्यातील देवदासींची चाल व त्यांची होणारी कुचंबना, घरंदाज घराण्यातील सुशिक्षितांची गुलामी मनोवृत्ती, न शिकलेल्या लोकांची दबलेली भावना, शेजा-यापाजा-यातील वैर, हेवेदावे, भांडणे, धार्मिकता, शेतीची होणारी नासाडी, परकीय लोकांच्या लाचारीला चटावलेली उथळ व विकृत मनोवृत्ती या सर्वांचे चित्रण सुखटणकरांनी आपल्या प्रादेशिक कथांमधून केले आहे. पण त्यातील लेखन ते 1926 ते 28 पासूनच करताना दिसतात.

परंतू 1920 नंतर गांधीवादाचा प्रभाव महाराष्ट्र जीवनावर झाला. पण साम्यवादाचा व समाजवादाचा भारतात समावेश झाला. इतिहास जागृत करण्याच्या चिपळूणकरी प्रवृत्तीचा परिणाम लेखनावर झाला. ग्रामीण परिसर सुखटणकरांना उभा करण्याची प्रेरणा साम्यवादातून, गांधीवादातून, देशप्रेमातून, स्वतंत्रतेतून मिळाली आहे. अशा प्रकारच्या मर्यादा त्यांनी लेखनात निर्माण केल्या.

वि.स. सुखटणकरांच्या संदर्भात लक्ष्मणराव सरदेसाई म्हणतात -

"त्यांची दृष्टी अंतर्भेदी नसून ती बाह्य स्वरूपावर स्थिरावलेली व रमलेली दिसते".

सुखटणकरांच्या मागोमागच लक्ष्मणराव सरदेसाई यांनी कथालेखन केले. त्यांच्या कथेतील परिसर हा गोमंतकीयच आहे. सृष्टीसौंदर्याने नटलेला निसर्ग हा गोमंतकातील अमाप व्यक्तीमत्वाचाच भाग आहे.

त्यांच्या कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', व 'ढासळलेले बुरूज' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

प्रादेशिक वातावरण निर्माण करण्यासाठी गोमंतकीय निसर्गाचे सुंदर वर्णन त्यांनी यात केले आहे.

परंतु 'मोडलेला माड', 'जरीचे पातळ' व 'गुरवाचे रक्त' इत्यादी कथा वेगळया वाटतात. पण या वेगळया प्रेरणा असल्या तरी ही प्रेरणा जीवनातील नाटय, मानवी स्वभावाचे नमुने, स्त्री-पुरूष संबंध या वैशिष्ट्यांनी निर्माण झाली आहे.

SHIVAJI UNIVE... L...
SHIVAJI UNIVE... L...

सुखटणकर व सरदेसाई या दोन प्रादेशिक लेखकांच्या लेखनात गोमांतकीय प्रदेशाच दिसतो. आपण लक्ष्मणराव सरदेसाई यांचा 1940 साली ' ढासळलेला बुरूज ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यानंतर लगेचच श्री.म.माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग ' हा संग्रह प्रसिध्द करून मराठी ग्रामीण कथेला नव्या जाणिवा निर्माण करून दिल्या.

माटे यांची प्रेरणा सुखटणकर व सरदेसाई यांच्याहून वेगळी आहे. त्यांचा दृष्टीकोन वेगळा आहे. पण जी तळागाळातील माणसे आहेत त्या माणसांचे जीवन त्यांनी आतून पाहिले. त्यांना ती माणसे दारिद्रयाने पिचलेली, गांजलेली व दु:खी, कष्टी दिसली. म्हणून दलितांची, उपेक्षितांची सेवा घडावी या भावनेने त्यांनी आपल्या कथा लिहिल्या व याच तळागाळातील माणसांच्या कथा साहित्यात निर्माण करून वाचकांपर्यन्त पोहोचवल्या. या भावनेने ते कथानकाकडे वळले. परंतु तिकडे वळल्यानंतर त्यांना माणसे जशी दिसली तशी आपल्या कथेत शब्दबध्द केली आणि तीच माणसे जीवन आणि जीवनात वावरणा-या मनांची एकसारखी जाणवली.

'तारळखो-यातील पि-या ', 'बन्सीधरा आता तू कोठें रे जाशील' इत्यादी कथा या दृष्टीने पहाव्या लागतील .

माटे हे विचारवंत व समाजसुधारक आहेत म्हणून आनंद यादव म्हणतात -

" माटे यांना ग्रामीण कथेचे हरिभाऊ म्हटले तर ठोकळ यांना फडके म्हणावे लागेल. ना.सी. फडके यांनी ग्रामीण कथेला जे स्वरूप दिले तेच स्वरूप ग.ल.ठोकळ यांनी ग्रामीण कथेला काही प्रमाणात दिले." (8)

ठोकळांच्या कथांचे विषयच खेडयातील अज्ञान, सण, उत्सव, प्रेमप्रकरणे, भानगडी, त्यातील कृषीजीवन, भटक्या जमातींचे जीवन असे आहेत. त्यांच्या कथांचे विषय पाहिले तर आपणास 'गावगाडा' व 'गावगाडयाबाहेर' या दोन पुस्तकांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या लेखनाच्या दृष्टीने ग्रामीण जीवनाचा अनुभव कसा महत्वाचा ठरला हे सांगताना ते लिहितात -

" मी मुळचा खेडयातला असल्यामुळे ग्रामीण जीवन हा माझ्या काव्यातला हक्काचा प्रांत होता.

SHIVAJI UNIVER... K...

कथालेखक झाल्यावरही मी या प्रांतात फिरू लागलो. तत्पुर्वी ग्रामीण जीवनावरच्या कथाही विशेष कोणी लिहल्या नव्हत्या. "

या दृष्टीने ' ग्रामीण कथा ' हा शब्दही नव्यानेच उपलब्ध झाला.

त्यांच्या कथेत निसर्गवर्णन तर येतेच पण रांगडेपणा, रानदांडगेपणा, कल्पकता, एखाद्यावर अन्याय, जबरदस्ती इत्यादी गोष्टी त्यात दिसतात आणि हे सर्व चटकदार, चमकदार भाषेतून व्यक्त होते.

ग.ल.ठोकळ व र.वा.दिघे हे दोघे जवळ-जवळ समकालीनच. पण ठोकळांनी जशी ग्रामीण कथा लिहीली तशीच र.वा.दिघे यांनी कोकणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण कथा लिहली. ठोकळांच्या कथेचे विश्व जसे व्यापक आहे तसे दिघ्यांचे विश्व व्यापक आहे.

दिघ्यांच्या कथेतून कोकण येथील लोकांची भाषा, शब्द कोकणातील निसर्गाचे टिपलेले दृष्य यांचे दर्शन घडते. त्यांच्या काही कथा काल्पनिक असल्या तरी अनेकवेळा त्यांनी खेडेगावच्या जीवनातील प्रश्न आपल्या कथातून मांडले आहेत.

याच काळात काही लेखकांनी नगरकथा लिहल्या तर काही ग्रामीण कथा लिहल्या त्यापैकीच वामन चोरघडे व दत्त रघुनाथ कवठेकर हे लेखक होत.

वामन चोरघडयांच्या कथेतून उत्कट, तरल, सूचक, भावनाविश्कार प्रत्ययाला येतो. त्यांची कथा मानवी मनाचे हळूवारपणे पापुद्रे उलगडताना दिसते. स्त्रियांच्या मनाचा घेतला जाणारा, त्यांच्या मनातील, जीवनातील अबोल दुःखे, त्यांच्यातील भावनेची काव्यमय पातळी इत्यादी वैशिष्ठये त्यांच्या कथेत येतात.

' गोरी बायको ' , ' अतिथी देवो भव ' , 'भाकरी', इत्यादी कथा या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत.

दत्त रघुनाथ कवठेकर हे कुटुंब वळणाचे कथाकार आहेत. त्यांची कौटुंबिक भावना व संबंध यात रमताना दिसते. कित्येकवेळा त्यांची कथा भावविश्कार वाटावी इतक्या कारूण्याच्या

भावनेने भरली आहेत. या सर्वच वैशिष्टयांनी त्यांची कथा उदयाला आली असे म्हणावयास हरकत नाही.

य.गो.जोशी हे द.र.कवठेकरांप्रमाणेच कौटुंबिक वळणाचे कथाकार आहेत. त्यांची ' शेवग्याच्या शेंगा ' ही कथा प्रसिध्द आहे.

म.भा.भोसले यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव आहे म्हणून ग्रामीण जीवनावर निष्ठा ठेवून कथा सातत्याने लिहल्या. त्यांच्या कथेतील संघर्ष, स्थूल, सांकेतिक व अनाकर्षक वाटतो. भाषाशैलीत सरळपणा आहे. त्यांची प्रेरणा जीवन रेखाटत राहण्याची आहे.

1925 ते 1945 च्या ग्रामीण कथाकारांच्या कथेचा विचार केला तर असे दिसते की - ग्रामीण कथा या थोडयाफार फरकाने ग्रामीण जीवनाविषयी नाते ठेवून ग्रामीण जीवनाविषयीच्या आस्था बाळगून कथालेखन केलेले दिसते. ग्रामीण कथेला ख-या अर्थाने सुरवात वि.स.सुखटणकर व लक्ष्मणराव सरदेसाई यांनी कोकणाच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक कथा लिहून केलेली दिसते.

1925 पूर्वी ग्रामीण कथा अस्तित्वात नव्हती असे नव्हे तर हरिभाऊंची ' काळ तर मोठा कठीण आला ' ही स्फूट गोष्ट आहे. त्यात त्यांनी दुष्काळात शेतक-यांच्या हालाखीची परिस्थिती कशी होते याचे वर्णन केले आहे. त्यात ते थोडाफार ग्रामीण साज चढवतात. म्हणून 1925 पासून ग्रामीण कथेला सुरवात झालेली असली तरी भाऊंच्या 1897 साली लिहिलेल्या कथेपासूनच ग्रामीण कथेला सुरवात झाली असे म्हणावयास हरकत नाही.

1945 नंतरचा काळ हा दुस-या महायुध्दाचा काळ म्हणून म.ना.अदवंत म्हणतात -

" दुस-या महायुध्दाने समाजावर जी विफलतेची व विकलतेची छाया पाडली व मानवी जीवनातील चिरंतन मुल्ये धडाधड कोसळून पडलेली दिसल्यामुळे जी अश्रध्द वृत्ती समाजाच्या ठिकाणी निर्माण झाली होती तिचे अतिवास्तव आणि अतिकटू चित्रण ती करू लागली. दुस-या महायुध्दाने उध्वस्त झालेल्या विश्वाचे व मानवतेच्या विटंबनेचे दर्शन ती घडवू लागली. त्यासाठी मनोविश्लेषणाच्या तंत्राचा आश्रय करून माणसाच्या अंतर्मनात खोलवर दडून बसलेल्या आशाआकांक्षांची,

दबलेल्या विचारांची विकृत भावनांची चित्रे ती रंगवू लागली त्यासाठी तिने आपला आकार व बाहय स्वरूपही बदलले.'

या महायुध्दाची मानवी प्रवृत्ती, वर्गव्देष आणि या बदललेल्या जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटवले या हेतूने हे कार्य मराठीत गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगूळकर या नव्या दमाच्या लेखकांनी निर्माण केले. पण ते नव्या कलात्मक दृष्टीने ग्रामीण कथा, ग्रामीण व्यक्तिचित्रे लिहू लागले. जसे नागर कथेला वरील लेखकांनी (गाडगीळ, भावे, माडगूळकर) नवा साज चढवला तसाच व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण साहित्यात चढवला.

व्यंकटेश माडगूळकरांनी 1949 पासून ग्रामीण लेखनास प्रारंभ केला असता तरी, ते ज्या माण देशाच्या मातीत जन्मले, वाढले, त्या मातीतील माणसे त्यांना जशी दिसली, जाणवली, बोलली, भेटली, आवडली तशीच त्यांनी आपल्या ' माणदेशी माणसं ' या व्यक्तीचित्रणाच्या पुस्तकातून चित्रीत केली.

माणदेशाचा परिसर लेखनातून साकार केला. त्यातील जीवनाचे विविध अंगांनी, विलक्षण संपन्नतेने चित्रण केले. त्यात अनेक प्रकारच्या व्यक्ती, अनेक प्रकारच्या घटना यांचा समावेश आहे.

' ओझं ' च्या प्रस्तावनेत गो.मा.पवार म्हणतात - ' मोठी गुणवत्ता असणा-या लेखकांच्या लेखनाला अनेकविध पैलू असतात. त्या त्या वेळी त्यांच्या गुणांचे मुल्यमापन केलेले असते. पण काही काळ गेल्यानंतर त्याच लेखकांच्या लेखनाचे नव्याने आकलन व मुल्यमापन करणे आवश्यक आहे. माडगूळकर अशा प्रकारचे मोठी गुणवत्ता असणारे लेखक आहेत. त्यांच्या लेखनाला अनेकविध पैलू आहेत. चित्रण क्षेत्र व्याप्ती अपूर्व आहे. निसर्गप्राणी हे तर त्यांच्या चित्रणाचे विषय तर ग्रामीण माणूस, शेतकरी, ब्राम्हण, मुसलमान, स्पृश्यास्पृश्य, बलुतेदार हे त्यांच्या कथांचे विषय आहेत.' (10)

प्रा.डॉ.भालचंद्र फडके ' सहकथाकार ' च्या प्रस्तावनेत म्हणतात -

" माडगूळकरांच्या कथेतील माणसाचे नाते मातीशी आहे. दारिद्र्य सोसणारी माणसे, जीवन उजाड करून टाकणारे दुष्काळ, कलागती, अतर्क्य, घटना, प्राणी, जंगली जनावरे, रानपाखरे यांनी त्यांचे कथाविश्व गजबले आहे." (11)

तर म.ना.अदवंत 'प्रदक्षिणा' त म्हणतात -

" माडगुळकरांची कथा माणदेशातील जीवनाने अंतर्बाहय रंगली आहे. त्या जीवनातील विविध रंग व विविध ढंग तिने कलात्मकतेने टिपून घेतले आहेत. त्यांच्या सुखदुःखाशी, त्यांच्या आचार-विचारांशी व त्यांच्यातील हेव्यादाव्यांशी, संघर्षाशी ती संपूर्णपणे एकरूप झाली आहे. तिचे दर्शन सहानुभूतीने वाचकांना घडविले." (12)

या सर्व समीक्षकांचा विचार केला तर असे दिसते की, माडगुळकरांच्या जवळ मोठी गुणवत्ता आहेच पण त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रेही दारिद्रयाने पिडलेली, दुःखी, सहनशील, गांजलेली, वेडी-बिद्री अशी रेखाटली. गांव, तेथील लोकांचे परस्पर संबंध, हेवेदावे, भानगडी, इर्षा, शेती, पिके, जनावरे यातून होणारा संघर्ष हे विषय त्यांनी आपल्या कथांतून मांडले आहेत.

माडगूळकरांनी मराठी ग्रामीण कथेच्या चित्रण क्षेत्राचा अपूर्व विस्तार केला. एवढेच नव्हे तर ग्रामीण समाजातील स्पृश्य आणि अस्पृश्य लोकांच्या जीवनाचे दर्शन घडवणा-या कथा त्यांनी लिहल्या. नवोदित लेखकांवर त्यांच्या लेखनाचा प्रभाव पडला.

माडगुळकरांच्या पाठोपाठ शंकर पाटील हे कथा लिहू लागले. त्यांनी सुरवातीला सर्व भिस्त कथेवरच ठेवली. त्यांची कथा माणूस आणि भोवतालची परिस्थिती हाच केंद्रबिंदू ठेवून लिहलेली दिसते. त्यांच्या कथेतील व्यक्ती दारिद्रयाला तोंड देत, अन्याय सहन करत जगताना दिसतात. या दृष्टीने 'भुजंग', 'रामा', या कथा पहाण्यासारख्या आहेत.

निसर्ग तर त्यांच्या प्रत्येक कथेतून येतो. तो तर त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे. निसर्गाच्या दृष्टीने 'आभाळ', 'ऊन', 'वळीव' या कथा पहाव्या लागतील.

शंकर पाटील यांनी मानवी मनाचे दर्शन घडविले. त्या मानवी मनातील गुंतागुंतीचे हळूवारपणे पापुद्रे उलगडून दाखविले. त्यांनी जवळ-जवळ थोडयाफार कथांतून सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातीलच वर्णन केले आहे.

पाटलांची कथा जणू व्यक्तिमनाच्या अनुभूतीची नेमकी प्रकृती ओळखते व ती व्यक्त होईल अशाप्रकारे तिला शब्दरूप देते. हेच त्यांच्या कथानिवेदनाचे खास वैशिष्टय आहे.

पाटलांच्या कथेबाबत आनंद यादव म्हणतात -

" पाटलांनी खेडयातील जीवन थोडे गौण मानून खेडयातील मने अधिक व्यक्त केली. कलात्मक जाणिव तीव्र करून ग्रामीण कथा अधिक समृध्द केली. कलेच्या दिशेने तिला वेगळया वाटा दाखवल्या, वेगळया शक्यता निर्माण करून ठेवल्या." (13)

पाटलांच्या बरोबरच द.मा.मिरासदार यांनी ग्रामीण कथेला वेगळी दिशा दाखवली. ग्रामीण विनोदी कथा प्रथम मिरासदार यांनीच लिहल्या. 'मिरासदारी' कथा या नावाने ओळखणा-या त्यांच्या हास्यप्रधान कथांतून मिस्कीलपणाच दिसतो. 'माझ्या बापाची पेंड' हा त्यांचा पहिला विनोदी कथासंग्रह प्रसिध्द आहे.

मिरासदार म्हणतात -

" गावातल्या चावडींवर, कटयावर किंवा पारावर मंडळी तंबाखू चोळत बसली आहेत, गप्पांना रंग चढत आहे, लालभडक पिचका-यांनी आसमंत 'टेक्नीकलर' होत आहे. अशा वातावरणात माझी गोष्ट रंगते."

त्यांच्या कथेतून विविध स्वभावाच्या माणसांचे नमुने पहावयास मिळतात. बढाईखोर, भित्रट, इरसाल, कावेबाज, धुर्त, विक्षिप्त, नादिष्ट इत्यादी माणसे भेटतात. भुते, प्रेते, चो-या, फसवणूक, गुन्हे, खटले, साक्षी इत्यादी रंजक विषयच त्यांनी त्यांची विनोदनिर्मिती भोळसरपणाचा, बावळटपणाचा मुखवटा धारण करते.

उध्दव शेळके हे व्यंकटेश माडगुळकरांच्या बरोबरीनेच ग्रामीण कथा लिहू लागले. माडगुळकरांनी माणदेशी ग्रामीण जीवन जेवढया ताकतीने रेखाटले तेवढयाच पण थोडयाफार फरकाने शेळक्यांनी विदर्भ व व-हाड या भागातील ग्रामीण जीवन रेखाटले.

शेळके यांनी आपल्या कथांतून विदर्भातील खेडयाच्या जीवनाची असाहयता, दैवाधिनता, दु:ख, दारिद्रय भोगत राहण्याची मनोवृत्ती, विशेषतः सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे दलित वर्गावर होणारे

अन्याय यावरच त्यांनी आपल्या कथेत भर दिला आहे.

ग्रामीण कथेच्या क्षेत्रात आणखी ज्यांची नावे प्रामुख्याने घेता येतील त्यातील काही कथाकार पुढीलप्रमाणे आहेत.

'रणजित देसाई', 'रा.रं.बोराडे', 'अण्णाभाऊ साठे', 'शंकरराव खरात' इत्यादी पण या सर्वांच्या कथानकाची प्रकृती वेगळी आहे.

रणजित देसाई यांनी 1947 च्या सुमारास कथालेखनास सुरूवात केली. त्यांनी त्यांच्या 'कातळ' या संग्रहात बदलत्या ग्रामीण जीवनाचा, बदलत्या संस्काराचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात दोन दीर्घ कथा आहेत. 'पेरा उगवला' व 'पांढर उठली' या त्या कथा होत. त्यांची त्यातील भाषा संयत झाली आहे. निवेदकाच्या भाष्यापेक्षा ते प्रसंग व व्यक्तीच्या हालचाली व्यक्त करताना दिसतात.

रा.रं.बोराटे हे मराठवाडयातील ग्रामीण कथाकार आहेत. लहान मुलांच्या अनुभवातून त्यांची कथा वेगळी अशी वाटते. लैंगिक विषय तर त्यांनी विनोदाच्या साहयाने लिहले. पण त्याकडे ते काही प्रमाणात वळलेले दिसतात. ते ग्रामीण जीवनातील विसंगतीचे विनोदपूर्ण दर्शन घडवितात.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या जाती-जमातीविषयी लिहले. त्यांच्या कथेत वेदना, विद्रोह, नकार ही त्रिसूत्री आहे. त्यातील व्यक्तिरेखा अन्यायाविरूध्द प्रतिकार करणा-या, हसत-हसत दुःखाला सामो-या जाणा-या, मृत्यूला सामो-या जाणा-या, जीवनाचे तत्वज्ञान सांगणा-या, खून मारामा-या, गुन्हे करणा-या, दरोडे घालणा-या आहेत. या सर्वांचे चित्रण अतिशय प्रत्ययकारी झाले आहे. त्यांच्या कथांतून घटनांचा होणारा वापर कथेला अद्‌भूतरम्य पातळीवर नेताना दिसतो.

साठेंच्या प्रमाणेच खरातांनी आपल्या जातीजमातीविषयी लिहले. साठेंच्या व्यक्तिरेखेपेक्षा खरातांची पात्रे सोशिक आहेत. ती अन्यायाच्या खाईत शांतपणे उभी राहतात, कोणतीही गोष्ट मुकाटपणे सहन करतात. तरीही ती कुठेही अन्यायाविरूध्द बंड करून उठताना दिसत नाहीत. माटयांच्या लेखनाचा प्रभाव खरातांच्या कथेवर पडलेला दिसतो.

उदा.- 'सांगावा', 'जागल्या' इत्यादी कथा यादृष्टीने पाहण्यासारख्या आहेत.

1945 च्या आधिच्या म्हणजे दुस-या महायुध्दाच्या आधी व नंतरच्या कथाकारांचा विचार केल्यानंतर आजचे अलिकडील ग्रामीण कथाकार, समीक्षक म्हणजे आनंद यादव होत. त्यांनी 1963 पासून ग्रामीण कथालेखनास सुरूवात केलेली दिसते. वरील सर्व लेखकांची ताकत यादव यांनी अभ्यासली आहे म्हणून तर त्यांनी उत्कटतेने, तरलतेने, कलात्मकतेने व सखोलतेने लेखन केलेले दिसते.

यादवांनी 1963 साली 'मातीखालची माती' हा ग्रामीण व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रथम लिहला. या कथासंग्रहातील व्यक्ती या ग्रामीण भागात तयार होतात. त्यातील व्यक्ती या अन्यायाखाली दबलेल्या, पिचलेल्या आहेत. त्या अज्ञानी अडाणी आहेत, तर काही प्रामाणिक आहेत तर काही अप्रामाणिक आहेत. जी अप्रामाणिक आहेत त्यांना परिस्थितीनुसार अप्रामाणिक बनावे लागले असेल.

उदा.- 'बापू मांग', 'आक्कू मावशी' वं 'गडी' इत्यादी व्यक्तिचित्रे पाहण्यासारखी आहेत.

त्यातील काही कथा वेगळया अशा आहेत. 'सखाराम', 'फुलाआत्ती' या त्या कथा होत.

आनंद यादव ग्रामीण कथा लिहण्याअगोदर ग्रामीण कविता लिहू लागले. त्यांची 'हिरवे जग', 'मळयाची माती' इत्यादी ग्रामीण कवितांचे संग्रह प्रसिध्द आहेत. त्याचबरोबर त्यांनी विनोदी कथासंग्रहही लिहले. 'घरजावई' व 'माळावरची मैना' हे दोन विनोदी कथासंग्रह होय.

ते कवितेकडून कथेकडे कसे वळलो हे सांगताना म्हणतात -

'रसिकवाचक आणि मराठी साहित्याचा अभ्यासक या नात्याने मी मराठी साहित्याचा आस्वाद घेत होतो, ते शिकवितही होतो. त्यावेळी मराठी ग्रामीण कथेच्या अनेक मर्यादा मला जाणवल्या व म्हणूनच मी कवितेकडून कथेकडून वळलो'.

त्यांचे 'खळाळ', 'उखडलेली झाडे' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यात त्यांनी ग्रामीण भाषेचा पुरेपूर वापर केला आहे. त्यांच्या कथासंग्रहातील व्यक्ती, पात्रे ग्रामीण भागातच तयार होतात व कथांचा शेवटही ग्रामीण भागातच होतो. पण जेथे-जेथे आवश्यक आहे तेथे-तेथे ते पूर्ण ग्रामीण भाषेतून आपली कथा अविष्कृत करतात.

यानंतर बरेच कथाकार होऊन गेले. त्यापैकीच हमिद दलवाई, मधु मंगेश कर्णिक व ग.दि.माडगूळकर इत्यादी.

हमिद दलवाई हे राष्ट्रसेवादलात काम करत असत. त्यांत सर्व धर्म समभाव व निधर्मी राज्य याची कल्पना आहे. ही जाणीव त्यांना होती आणि हिंदू-मुस्लीम संबंध कसा आहे हे उलगडून दाखवण्यावर भर देऊन त्यांनी लेखन केले आहे. म्हणून त्यांच्या कथांचा साज वेगळा आहे.

माडगूळकरांनी जसे माणदेशी माणसांचे चित्रण आपल्या व्यक्तीचित्रातून केले आहे. तसेच त्यांचे थोरले भाऊ ग.दि.माडगूळकर यांनी माणदेशी परिसर आपल्या कथांतून रेखाटला आहे. त्यांच्या कथा ग्रामीण व नागरी या दोन्ही विश्वातून वावरताना दिसतात.

सारांश - अशाप्रकारे 1945 च्या पूर्वीच्या व नंतरच्या ग्रामीण कथाकारांचा विचार करताना एक गोष्ट जाणवते ती म्हणजे हे सर्व लेखक ग्रामीण भागात राहूनच लेखन करतात असे नव्हे तर ते शहरातही राहून लेखन करू लागले. त्यापैकीच 'शंकर पाटील', 'आनंद यादव' हे होत.

आतापर्यंत 1925 ते 1965 पर्यंतच्या आढाव्यावरून असे दिसते.

हरिभाऊंनी आपल्या 'काळ तर मोठा कठीण आला' ही स्फूट गोष्ट लिहून ग्रामीण कथेला सुरूवात करून दिली.

तर सुखटणकर, सरदेसाई व मधुमंगेश कर्णिक हे सगळे 1960 नंतरचे कथाकार आहेत. या सर्वांनी प्रादेशिक ग्रामीण कथा कोकणच्या पार्श्वभूमीवर लिहिली.

माटे यांनी उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविले तर ठोकळ व दिघे यांनी फडक्यांचाच वारसा पुढे चालविला.

द.र.कवठेकर व य.गो.जोशी यांनी कौटुंबिक भावना व संबंध यांचेच चित्रण कथेतून केले.

म.भा.भोसले यांनी ग्रामीण भागातील परिसर व तेथील लोकांची परिस्थिती यांचे वर्णन केले.

माडगुळकरांनी माणदेशचा परिसरच आपल्या कथांतून रेखाटला आहे. त्यांच्या कथेतील पात्रे माणदेश सोडून कोठेही जाताना दिसत नाहीत. व्यंकटेश माडगुळकरांप्रमाणे ग.दि. माडगुळकर यांनी माणदेशचा परिसर रंगवला.

शंकर पाटील यांनी ग्रामीण कथा लिहून मानवी मनात जे आंदोलन चालू आहे. त्याचा खोलवर विचार करून त्याचे हळूवारपणे पापुद्रे उलगडून दाखविले.

शंकरराव खरात व अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या जातीजमातीविषयी लिहले. त्यात ते ग्रामीण भाषेचा पुरेपुर उपयोग करतात.

आनंद यादवांनी तर प्रथम 'मातीखालची माती' हा व्यक्तिचित्रांचा संग्रह लिहून त्यांनी ती माणसे जशी दिसली तशीच त्यांनी आपल्या संग्रहात चित्रित केली.

वरील सर्व कथाकरांच्या लेखनीतून ग्रामीणताच उतरलेली दिसते.

परंतु 1965 नंतरची कथा वेगळयाच शैलीतून निर्माण होते. त्याला वेगळीच कलाटणी मिळते. या काळातील लेखक शहरात राहूनच लेखन करताना दिसतात.

इथंपर्यंत ग्रामीण साहित्याचा अभ्यास केल्यानंतर हा अभ्यास करण्यासाठी आपणास इतर महत्वाच्या बाबी पहाव्या लागतील.

आज भारतात 80% लोक खेडयात राहतात व 20% लोक शहरात, पण हे शहरात कामानिमित्त आले व तेथेच स्थायिक झाले. या 80% लोकांचे उदरनिर्वाहाचे साधनच शेती आहे. शेतीवरच त्यांचे सर्व जीवन अवलंबून असते त्यावेळी शेतीशिवाय कोणतेच काम नसायचे. त्याकाळी वर्षातून एकच पीक निघे. आजच्यासारखी परिस्थिती नव्हती आता पाण्याची सोय झाली असल्यामुळे वर्षातून दोन - तीन पीके निघू लागली . पूर्वी निसर्गावरच सर्व काही अवलंबून असायचे. जर कां निसर्गानेच साथ दिली नाही तर शेतक-यांचे नुकसान होत असे.

त्याचप्रमाणे तेथील परिस्थितीही वेगळी होती. तेथे शाळा, दवाखाने, एस्.टी.ची सोय नव्हती.

शाळेसाठी तर मुलांना खुप दूरवर चालत जावे लागे. कुठे एखादी शाळेची सोय असलीच तर एक शिक्षकी शाळा असायची. त्याकाळी तर मुलींना शिक्षणाची संधीच मिळत नसे.

परंतु आज ग्रामीण संस्कृती आणि नागर संस्कृती यात तफावत जाणवते. ती म्हणजे ग्रामीण संस्कृती ही स्थिर असते आणि तेथील आचार-विचाराला भेद पडत नाहीत. तरीही खेडयाचे स्वरूप साचेबंद व पारंपारिक असते. याच खेडयातील लोकांच्या श्रध्दा, समजूती अगदी ठरलेल्या असतात. त्याला सहसा भेद पडत नाहीत.

पण आज खेडे सुधारले आहे. खेडयातील तरूण शहरात येऊन शिक्षण घेऊन तशा सुधारणा करू लागला आहे. शाळा, दवाखाने, एस्.टी. च्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत. मुलींना शिक्षणाची संधी मिळू लागली आहे. आजच्या खेडयातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे, गावात सर्व सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत याची जाणिव होऊ लागली. एवढे सर्व असूनसुध्दा ते आपली संस्कृती सोडायला तयार नसतात.

तर ही ग्रामीण संस्कृती पूर्वीची ग्रामीण संस्कृतीच होती. आणि ही शेती निसर्गावर अवलंबून असायची. जर पाऊस पडला नाही, निसर्गाने साथ दिली नाही तर मात्र शेतक-यांचे आतोनात नुकसान होई. म्हणून ग्रामीण साहित्यात शेती हा घटक आणि शेती संस्कृती हेच केंद्रस्थानी ठेवले आहे.

अशाप्रकारे जर आपणास ग्रामीण साहित्याचे स्वरूप समजावून घ्यावयाचे असेल तर खालील चार पुस्तकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ती चार पुस्तके पुढीलप्रमाणे -

1) गावगाडा : त्रि. ना. अत्रे

2) आमचा गाव बदलापूर : नारायण गोविंद चापेकर

3) गावरहाटी : वि.म. दांडेकर व म.भा. जगताप

4) गावगाडयाबाहेर : प्रभाकर मांडे

SHIVA LIB

प्रथम 'गावगाडा' या त्रि.ना.अत्रे यांच्या पुस्तकांचे स्वरूप पाहू. हे पुस्तक त्यांनी 1915 साली लिहले आहे. त्यात ग्रामीण संस्कृती व ग्रामीण रचना यांचाच विचार केला आहे.

त्रि. ना. अत्रे यांनी शेती आणि शेतकरी यालाच केंद्रस्थानी ठेवून हे पुस्तक लिहले आहे. 'गावगाडा' हे पुस्तक वाचले की प्रथम डोळयासमोर गाव उभे राहते. पूर्वी खेडे कसे होते, खेडयाची रचना कशी होती, तेथील जमीनी कशा होत्या, गावातील मुकादम कसा होता, गावात सुधारणा कोणती करावी लागेल तर ते खेडे सुधारेल अशा खेडयांचे सुंदर व सूक्ष्म चित्रण त्यांनी केले आहे.

'गावगाडा' यात त्रि.ना. अत्रे म्हणतात - "खेडे म्हटले की पांढरीच्या अगोदर चटकन काळीच उभी राहते. शेते, पीके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळया, मेंढया, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, भुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, माळा, गोकण इत्यादी".[15]

खेडे म्हणजे काय? तर खेडणे म्हणजे जमीन कसणे यांपासून खेडे हा शब्द तयार झाला आहे. असे खेडयाचे वर्णन करून कारू व नारू ची माहितीही त्यांनी दिली आहे.

चौगुला, सुतार, महार, लोहार, कुंभार, चांभार, जोशी, परीट, न्हावी, कोळी, गुरव इत्यादी कारू होत.

तेली, तांबोळी, धनगर, साळी, माळी, गोंधळी, भाट, डवरी, ठकार, गोसावी, मुलाना, जंगम, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराळ, भोई इत्यादी नारू होत.

म्हणजेच शेतीला जे अवजार पुरविले जातात त्यांना कारू म्हणतात. उदा - लोहार, चांभार, कुंभार ...... इत्यादी. अलुते व बलुते यांनाही शेतीत महत्व असते. बलुत्यांना 'बलुतेदार' म्हणतात. त्यांना आवश्यक ते काम करावे लागतात. म्हणून तर कुणब्यांना त्यांच्याशिवाय चालत नाही. अलुत्यांना 'अलुतेदार' म्हणतात. त्यांचे काहीही काम नसते पण ठराविक वेळी त्यांची गरज असते.

म्हणजे बलुतेदारांना मालकी हक्क ठरलेलाच असतो. तो हक्क त्यांना मिळाल पाहिजे हा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

संस्कार ग्रामीण साहित्यात रूजला गेला. त्यांना वर्षाकाठी काही ठराविक धान्य मिळते. पण काही असे असतात की ते वर्षातून केव्हातरी येतात. त्यांचाही हक्क ठरलेला असतो.

गाय व वासरू हे ही या शेती संस्कृतीतील महत्वाचे प्रतिक आहे हे गाय व वासरू कां? त्यांचा शेतीशी घनिष्ठ संबंध असतो. त्यांच्याशिवाय शेती होऊच शकत नाही. पाटील-कुलकर्णी, कारू-नारू व फिरस्ते यांच्या भोवतीच ग्रामीण जीवनाची रचना बांधली जाते.

सरंजामशाहीची सर्वात मोठी शक्ती पाटील व कुलकर्णी यांची आहे. म्हणून प्रत्येक कादंबरीत पाटील व कुलकर्णी ही जोडी येताना दिसते.पुर्वी पाटील शिकलेला नसायचा त्यामुळे तो गावची कामे करी व कुलकर्णी हा शिकलेला असायचा त्यासाठी त्यांच्याकडे गावचे हिशेब ठेवण्याचे काम, लिखाणाचे काम येई.

अशाप्रकारे अत्रे यांच्या 'गावगाडा' या पुस्तकात जसे पाटील-कुलकर्णी आहेत. तसेच वेगवेगळया जातीही आहेत आणि त्यांच्या पोटजातीही आहेत. धंद्यानुसार या जाती पडलेल्या दिसतात. यांचा गावाशी कोणत्या-ना-कोणत्या प्रकारे संबंध असतोच. म्हणजेच गाव म्हटले की प्रत्येक जातीची घरे आलीच.

एकंदर त्रि.ना.अत्रे यांनी पाटील-कुलकर्णी यांचेबरोबर कारू-नारू ही आहेत. जर कारू व नारू नसतील तर शेतक-यांची शेतीची कामे कशी होणार म्हणूनच 'शेती' हाच केंद्रबिंदू ठेवून 'गावगाडा' लिहलेला आहे.

गावगाडयात अत्रे यांनी जो गाव, तेथील एकत्र कुटुंब पध्दती, गावगाडयात समाविष्ट असणारे कारू-नारू, पाटील-कुलकर्णी, फिरस्ते, त्यांच्या जाती पोटजाती या लोकांची माहिती दिली. तशीच पण गावगाडयाच्या बाहेर जी जमात आहे (भटकी जमात) म्हणजे गावात स्थान नाही, राहण्यास जागा नाही, उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेती नाही की इतर कोणता व्यवसाय नाही. म्हणजेच इतर गोष्टी (मनोरंजन) करून पोट भरावे लागते अशांची माहिती प्रभाकर मांडे यांनी 'गावगाडयाबाहेर' या पुस्तकात दिली आहे.

हे लोक आज इथे तर उद्या तिथे असे सतत भटकत असतात. त्यांचे राहण्याचे ठिकाणच निश्चित नसते, कुठे जागा मिळेल तिथे ते पाल ठोकून राहत असतात. तेथील काम संपले की दुस-या ठिकाणी जाऊन वस्ती करतात अशी त्यांची सतत भटकंती सुरूच असते.

उदा :- मग ते मोर नाचवणारे उक्कलवार असोत नाहीत वेगवेगळी सोंग घेऊन लोकांचे मनोरंजन करणारे बहुरूपी असोत किंवा लोक ज्योतिषांची एक भटकी जमात असो, इत्यादी या सर्वांचीच माहिती प्रभाकर मांडे यांनी अत्यंत प्रभावी रीतीने मांडली आहे.

या जाती मुळात कशा निर्माण झाल्या. प्रत्येक जात आपल्या जीवनासंबंधी कथा सांगते. प्रत्येकाचा व्यवसाय वेगवेगळा असतो, कुणाचा पोथ्या सांगणे, कुणाचा चित्रे दाखवून रंजन करणे तर कुणाचा पुराणे सांगणे इत्यादी.

प्रत्येक जाती-जमातींचा विधी वेगळा असतो. पाचवीचा विधी व बारशाचा विधी वेगळा, मेलेल्या माणसाचा विधी वेगळा असे वेगवेगळे विधी केले जातात.

अशाप्रकारे गावगाडयाबाहेर असणा-या या फिरस्त्यांचे व्यावसायिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक इत्यादींचे विवेचन प्रभाकर मांडे यांनी 'गावगाडयाबाहेर' या पुस्तकात केले आहे.

'आमचा गाव बदलापूर' हा ग्रंथ स्वरूप दृष्टीने कसा महत्वाचा आहे हे आता पाहू -

'बदलापूर ' हा ग्रंथ 1934 साली लिहला. तेथील आर्थिक, धार्मिक, ऐतिहासिक पाहणी करून हा ग्रंथ तयार केला. या ग्रंथाचा हेतू सांगताना लेखक म्हणतो -

"ब्राम्हण आणि कुणबी दोघेही दुर्दशेला जाऊ लागले आहेत. तर तिसरा श्रीमंत वर्ग उदयाला येतो आहे. याची पाहणी करण्यासाठी आपण आपल्या गावची आर्थिक पाहणी केली आणि इतर अंगाकडे वळलो.

आत्रे यांना 'गावगाडा' यात गावाची एकूण रचना कशी आहे. तेथे शेतीला महत्व कसे आहे तर त्याच्याबाहेर जी भटकी जमात आहे याचे वर्णन 'गावगाडयाबाहेर' या पुस्तकात केले आहे . या सर्व रचनेनुसार गाव कसा दिसतो याचे वर्णन 'बदलापूर' या ग्रंथात येते.

गावगाडयाप्रमाणेच बदलापूरमध्ये शेतीला महत्व दिले आहे. जसे शेती करण्याकरता शेतकरी आवश्यक आहेत तसेच कारू-नारू ही आवश्यक आहेत. म्हणून 'आमचा गाव बदलापूर' लिहताना कृषीकेंद्रीतता ना.गो. चापेकरांना महत्वाची वाटली.

म्हणजेच प्रभाकर मांडे जसे गावगाड्याबाहेरच्या लोकांचे वर्णन करतात त्याप्रमाणेच त्यांच्यातील लोक आपली कथा ऐकवतात. तशाच प्रकारे जवळ-जवळ सारखाच बदलापूर हा ग्रंथ वाटतो. त्यांचे विधीही सारखेच वाटतात. म्हणून 'बदलापूर' वाचताना प्रभाकर मांडे यांच्या ग्रंथाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्यातील चित्र आपल्या डोळयासमोर उभे राहते.

वरील तिन्ही पुस्तकांचा विचार करताना असे जाणवते की - गावगाडा आणि बदलापूर या दोनग ग्रंथातून शेती आणि शेतीसाठी आवश्यक असणारे कारू व नारू आणि कृषीकेंद्रीतता हीच वैशिष्टये यातून दिसतात.

बदलापूरमध्ये शेती, कारू-नारू आहेत तसेच इतर जातीही गावगाडयाबाहेर या पुस्तकांप्रमाणे आहेत. मांडे यांच्या पुस्तकातील विधी चापेकरांच्याही पुस्तकाच सारखाच वाटतो.

असे 'गावगाडा', 'आमचा गाव बदलापूर' व 'गावगाड्याबाहेर' या तिन्ही पुस्तकांचे स्वरूप समजावून घेतले. पण 'गावरहाटी' हे पुस्तक वेगळेच असे म्हणावे लागेल म्हणून रहाटीचे स्वरूप पाहू.

'गावरहाटी' हे पुस्तक वि.म.दांडेकर व म.भा. जगताप यांचे यात लेखकाने गाव कसा चालतो, कोणत्या क्रमाने चालतो याचे सूक्ष्म चित्रण केले आहे. परंतु आज खेडयाची रचना पहात असताना काळ बदलला असला तरी पूर्वीच्या गावगाडयाचा केवढा मोठा प्रभाव पडला आहे त हेच लक्षात येते.

ग्रामीण साहित्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा मानावा लागेल. या ग्रंथाची

सुरूवात नक्षत्रांपासून केली आहे. शेतीसाठी नक्षत्रांची आवश्यकता असते. नक्षत्रांची आवश्यकता का? तर वेगवेगळया नक्षत्रात वेगवेगळी पिके काढली जातात, पेरण्या केल्या जातात, भाजीपाला लावला जातो म्हणून शेतीला व शेती करणा-याला निसर्ग महत्वाचा वाटतो. ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा आहे.

ग्रामीण जीवनाची सुरूवातच मृगापासून होते व शेवट रोहिणी नक्षत्राजवळ होतो. मधे कुठे एखाद्या नक्षत्रात काम नसेल तर मग गावाची जत्रा, गावातील लग्ने उरकून घेतात. तेवढीच त्यांना मोकळीक मिळते.

असे जर ग्रामीण साहित्य म्हटले म्हणजे शेती व शेतीला आवश्यक असणारा निसर्ग हे आलेच. हवामान, पाऊस, थंडी, स्वच्छ आकाश, आभाळाचे वेगवेगळे रंग हे घटक शेतीसाठी येणं स्वाभाविक आहे. तसेच खेडे म्हटले म्हणजे राजकीय वातावरण येतेच. या राजकीय वातावरणाची वर्णनं येणे स्वाभाविक आहे. पिळला जाणारा व पिळणारा हे दोन घटक तिथे होतेच म्हणून तेथे राजकारण येते.

याप्रमाणेच ग्रामीण साहित्याचा अभ्यास करताना, त्यांचे स्वरूप पाहताना वरील चारही पुस्तकांचा थोडक्यात परिचय करून घेतला.

ग्रामीण संस्कृतीचे स्वरूप समजावून घेतल्यानंतर यातील आणखी एका अंगाचा विचार आपणास केला पाहिजे आणि तो म्हणजे दलित साहित्य होय.

### दलित साहित्य म्हणजे काय?

दलित साहित्याबद्दल वसंत मुन म्हणतात -

"बौध्द , अस्पृश्य, आदिवासी, भटक्या जमाती या सर्व ज्या साहित्याचे विषय आहेत ते दलित साहित्य होय".

तर नागनाथ कोतापल्ले म्हणतात -

"पारंपारिक मुल्यांना नकार देणारे, पुर्नजन्म, संचित कल्पना आणि कर्मवाद इत्यादी हिंदू धर्मातील

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

संकल्पनांना नकार देऊन समतेवर आधारीत अशा एका नव्या जीवनव्यवस्थची उभारणी करू इच्छिणारे ते दलित साहित्य होय".[16]

अशा दलित साहित्याच्या व्याख्या असल्या तरी, प्रत्येक दलित लेखक दलित साहित्यावर लिहिलच असे नाही त्याला वेगळा एखादा विषय सुचत असेल इतर लेखकांनी दलित साहित्यावर लिहले नाही का? प्रत्येक साहित्य हे दलित असतेच असे नाही तर ते साहित्य असते.

ख-या अर्थाने 1960 नंतरच दलित साहित्याला प्रारंभ झाला. यापूर्वीही दलित साहित्यावर लेखक लिहित होते पण ते थोडयाफार कथा लिहित.

आज ग्रामीण वाङ्.मय आणि दलित वाङ्.मय असे भेद पडले. या भेदाचाच परिणाम असा की त्यावेळी दलित समाजावर अन्याय होत होता या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवाज उठवला व दलित समाज जागा झाला. तेथून दलित समाज शिकू लागला, लिहू लागला, बोलू लागला.

ग्रामीण भागात दलित हे असतातच त्यामुळे त्या दलितांना गावकीची कामे करावी लागत. त्यांच्या जाती पोटजाती पडतात. त्यांना धंद्यानुसार कामे करावी लागतात. दलित समाज हा ग्रामीण भाग आणि शेती संस्कृती सोडूच शकत नाहीत. आंबेडकरांनी आवाज उठवल्यानंतर जवळ जवळ प्रत्येक दलित लेखक पोटतिकडीने लिहतो तेव्हा 1989 साली जे चर्चासत्रं झाले त्या अनुषंगाने वेगवेगळया लेखकांनी आपली मते मांडली आहेत.

'शांताराम पुरोहीत' दलित साहित्याच्या चर्चासत्रात म्हणतात -

'दलित साहित्य ही मुख्यतः चळवळ आहे हा संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. हे जे आव्हान आपल्यासमोर ठेवले आहे. तर विद्रोही साहित्याला सन्मानानं वागविले पाहिजे".[18]

तर गो. मा. पवार आत्मकथनांच्या संदर्भात म्हणतात -

'दुस-याला अनुभव येईल असे सांगणे म्हणजे कलात्मक अनुभव होय. ते तसे सांगावे, सच्चेपणानं लिहावं म्हणजे त्यामुळे महात्मता प्राप्त होते. कादंबरी जे काम करते तेच काम

आत्मकथने करतात. व्यापकपणानं मानवजातीकडं पाहण्याइतके हे लेखक समर्थ आहेत. एखादा समाज बंदिस्तपणानं ठोस, प्रत्ययकारी प्रसंग असे आत्मचरित्र आपल्यापुढे उभे करतात याची जाणीव आपल्याला होते".[19]

दलित लेखकांना जो स्वतःला अनुभव आला तसाच त्यांनी आत्मकथनांच्या रूपाने लिहिण्याच्या प्रयत्न केला. 1960 नंतरच ख-या अर्थाने दलित कथा, दलित कादंबरी, दलित आत्मकथने लिहली जाऊ लागली.

मग ते शंकरराव खरात यांचे 'तराळ अंतराळ' असो नाहीतर लक्ष्मण माने यांचे 'उपरा' असो किंवा माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' असो या सर्वांनीच आपल्या कथनांतून त्यांना जो अनुभव आला. त्यांना जी समाजाकडून वागणूक मिळाली याचे वर्णन केले आहे. हे झाले आत्मकथनांच्या बाबतीत तर कादंबरीच्या बाबतीत अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' ही कादंबरी घ्या. यात 'जोगणी' हीच या कादंबरीचा महत्वाचा घटक आहे. तर शंकरराव खरात यांचे 'सांगावा' हा कथासंग्रह घ्या. यात तर त्यांनी प्रत्येक जाती-पोटजातींचे वर्णन केले आहे.

म्हणूनच जर ग्रामीण जीवन म्हटले की त्यामध्ये दलित हे आलेच, त्यांचे साहित्य आलेच. म्हणजेच गांव म्हटले की दलित हा आलाच. मग त्यांची घरे गावात असो नाहीतर वेशीबाहेर असो त्यांना तिथे स्थान असते.

असे दलित साहित्य समजावून घेतल्यानंतर प्रादेशिक साहित्याचा विचार करावा लागतो. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या पुढील अभ्यासाची दिशा सुलभ होणार आहे.

1925 पासूनच प्रादेशिक साहित्याला प्रारंभ झाला. 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' व 'आजचे कालचे गोमंतक' हे दोन प्रादेशिक कथासंग्रह होत. त्यानंतर प्रादेशिक साहित्य लिहले ते र.वा.दिघे यांनी प्रादेशिक साहित्य म्हणजे वातावरण, त्या वातावरणाला जीवंतपणा व वेगळेपणा लागतो.

प्रादेशिक साहित्यात कोकणातीलच वर्णन येते जे कोकणातील वर्णन येते ते प्रादेशिक आणि

इतर ते नुसते साहित्य असे म्हणणे योग्य नव्हे. कोकणातील ग्रामीण साहित्याचे वर्णन केल्यानंतर ते ग्रामीण साहित्य होऊ शकते.

प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाला व संस्कृतीला जास्त महत्व नसते तर ते त्या प्रदेशाला असते आणि त्यातून व्यक्तीकेंद्रीतता व समुहकेंद्रीतता हीच वैशिष्ट्ये दिसून येतात. येथे वातावरणाचा जीवंतपणा व वेगळेपणा आहे म्हणून माडगुळकर व पेंडसे श्रेष्ठ लेखक ठरतात.

माडगुळकर व पेंडसे यांच्याही आधी 1909 मध्ये धनुर्धारी यांनी 'पिराजी पाटील' ही कादंबरी लिहिलीच ना। त्यातील तो शेतकरी व निसर्ग याच्या भोवतीच ही कादंबरी फिरते.

प्रादेशिकतेबद्दल नागनाथ कोतापल्ले म्हणतात -

"प्रादेशिकतेमध्ये एका भौगोलिक प्रदेशाला, तेथील सांस्कृतिक वेगळेपणाला जसे महत्व असते. त्याचप्रमाणे वाड्.मयाच्या संदर्भात तेथील 'सामुदायिक'तेलाही अतिशय महत्वाचे स्थान असते. एखाद्या व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून हे लेखन झाले तरी तेथे ध्वनित होत असते ती सामुदायिकताच".[20]

'बनगरवाडी' या माडगुळकरांच्या कादंबरीत विशिष्ट स्थानाचे (माणदेश) भौगोलिक भान महत्वाचे ठरते.

त्यानंतर श्री.ना. पेंडसे यांनी 'हद्दपार' व 'गारंबीचा बापू' इत्यादी प्रादेशिक कादंब-या लिहल्या.

श्री.ना. पेंडसे यांच्या संदर्भात गंगाधर गाडगीळ म्हणतात -

"पेंडसे यांना हे नंदनवन बालपणात हर्णेय जवळच्या भौगोलिक त्रिकोणात सापडले".[21]

म्हणून विशिष्ट प्रदेशाला किंवा टापूला कादंबरीची पार्श्वभूमी घेऊन कथानक लिहले जाते तेव्हा तिला प्रादेशिक कादंबरी म्हणतात -

तर आनंद यादव म्हणतात -

"एक नवी प्रादेशिकता म्हणजे अद्‌भूत जगाची उडती सतरंजी, गाणारे झाड, माणसे गिळणारा डोंगर असे एक एक करीत सारा निसर्ग कलावंतांनी या अद्‌भूत प्रादेशिकतेसाठी उपयोगात आणला. या अद्‌भूतात व्यक्त होतात व होऊ पाहतात ती सर्व मानवी व्यक्तित्वेच पण ती वास्तव संदर्भापासून मुक्त असतात. म्हणून वास्तव अनुभवांच्या जोडीने स्वप्नगत, भासगत, कल्पित आणि धुसर - अर्धस्पष्ट असे व्यक्तिमत्व जाणवते".[22]

या सर्व प्रादेशिकतेत निसर्गालाच जास्त महत्व असते. एखाद्या कादंबरीतील व्यक्ती, त्याच्या भोवती असणारा निसर्ग यातूनच प्रादेशिकतेत घटना, व्यक्ती व वातावरण हे सर्व त्या प्रदेशाला साकार करते त्यात व्यक्ती वा व्यक्तीसमुहाला महत्व नसून प्रदेशाला महत्व असते.

मराठीत प्रादेशिकता 1925 पासूनच आली असली तरी प्रादेशिकता ही कल्पना जुनीच आहे. पूर्वी संस्कृत नाटकात एखाद्या पात्राने प्रादेशिक भाषेत बोलायचे असे होतेच. असे प्रादेशिक साहित्य याचा विचार केल्यानंतर अनेक प्रादेशिक लेखक लिहू लागले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | र.वा.दिघे | : | सराई, रानजाई, पानकळा |
| 2) | गो.नी. दांडेकर | : | पडघवली, पवनाकाठचा धोंडी |
| 3) | ग.ल. ठोकळ | : | गावगुंड |
| 4) | द.र. कवठेकर | : | आभाळाची सावली |

या सर्व कादंब-या प्रादेशिक कादंब-या होत.

ग्रामीणांभोवती फिरणारे हे टापू आहेत . अशा ग्रामीण साहित्याचा व हे साहित्य समजून घेताना लागणा-या इतर बाबींचा विचार केला. आता आनंद यादव हे ग्रामीण लेखक, समीक्षक यांचा व त्यांच्या साहित्याचा परिचय आपणास पुढील प्रकरणात पहावा लागेल.

* * * * *

1) यादव आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या पृष्ठ 6

2) तत्रैव : पृष्ठ 143

3) कोतापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध - पृष्ठ 7

4) तत्रैव : पृष्ठ 14

5) भोसले द. ता. : ग्रामीण साहित्य : एक चिंतन - पृष्ठ 19

6) यादव आनंद : ग्रामीण साहित्य :स्वरूप समस्या
प्रस्तावना - गो.म. कुलकर्णी , पृष्ठ 1

7) तत्रैव : पृष्ठ 11

8) तत्रैव : पृष्ठ 14

9) अदवंत म. ना. : प्रदक्षिणा - पृष्ठ 163

10) माडगुळकर व्यंकटेश : ओझं
प्रस्तावना - गो.मा. पवार, पृष्ठ 1

11) फडके भालचंद्र : सहाकथाकार
प्रस्तावना - पृष्ठ

12) अदवंत म. ना. : प्रदक्षिणा - पृष्ठ

13) यादव आनंद : ग्रामीण साहित्य , स्वरूप आणि समस्या पृष्ठ 20

14) तत्रैव : पृष्ठ 176

15) अत्रे त्रि. ना. : पृष्ठ - 7 गावगाडा

16) कोतापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, पृष्ठ -


SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR

17) 1989 साली झालेले चर्चासत्रं

18) कोतापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध - पृष्ठ

19) गाडगीळ गंगाधर : खडक आणि पाणी - पृष्ठ 280

20) यादव आनंद : ग्रामीणता साहित्य आणि वास्तव - पृष्ठ 6.

* * * * *